भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४५०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यलय, भंडारा
दिनांक १६/०६/२०१७

**१) किराणा दुकानाचे समोरील दाराचा ताला तोडुन किराणा सामानाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०६/२०१७ चे २०.०० वा. ते १५/०६/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी चे मालकाचे किराणा दुकानाचा समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन दुकानामधील सोयाबीन तेल ०२ टिन, सिएफएल बल्प ०५ नग फिंगर ०२ किलो, चिल्लर पैसे २००/—रु. चिल्लर सामान, केरोसिन तेल ०१ टिन, साबुन असा एकुण ९००५/—रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी राजकुमार भिमसव कुंभरे वय ३६ वर्ष, येदरबुची यांचे तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) डिजीटल कॅमेऱ्याची चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०६/२०१७ चे १७.०० ते १३/०६/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहुण जोगीखेडा बिट अंतर्गत कक्ष क्र. ३९१ मानसरा सासर येथे लावलेला १ अंबुस कुट बॅट डिजीटल कॅमेरा मॉडल नं. ११७० किंमती १०,०००/—रु. चा चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम ३७९ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन अवैद्यरित्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १५/०६/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील आरोपी ट्रक चालक व मालकाने संगनमत करुन आपआपल्या ताब्यातील ट्रकमध्ये प्रत्येकी ०५ ब्रास रेती एकुण १० ब्रास रेती किंमती २०,०००/—रु. अवैद्यरित्या चोरुन वाहतुक करुन मिळुन आल्याने फिर्यादी गजानन सुखाजी कोंकडे वय ५१ वर्ष, रा. तहसीलदार कार्या पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे पवनी येथे कलम ३७९,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) दारु पाणी पिवुन शिवीगाळ व भांडण करुन खाली पाडुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०५/२०१७ चे १८.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी राजेश कृष्णा काळे वय ३९ वर्ष, रा. वाघबोडी याला आरोपीने दारु पाणी पिवुन शिवीगाळ करीत असता फिर्यादी त्यास हटकण्यास गेला असता आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ, भांडण करुन जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने त्याचा टांगा मध्ये टाग टाकुन खाली पाडल्याने फिर्यादीचे डावे पायाला व डावे हाताला जमीनीचा मार लागल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी व एक्सरे रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम ३२५,५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**५) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल वरुन खाली पडुन स्वतःच जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०६/२०१७ चे ११.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल मध्य प्राशन करुन हयगयीने व निष्काळजीपणे चालुवन स्वतःचे मोटार सायकल वरुन पडुन स्वतःच जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. शिंदे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**६) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०६/२०१७ चे २०.०० ते २३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले घरी झोपला असतांना व त्याची पत्नी कामा निमीत्त बाहेरगावी गेली असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीची अल्पयीन मुलगी व १६ वर्ष, हीला तिचे कायदेशीर पालकांच्या ताब्यातुन पळवुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**७) मोटार सायकला मागेहुन धडक मारुन तिघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १५/०६/२०१७ चे १२.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी जिवन लक्ष्मण मंडारी वय ४० वर्ष, रा. किटाळी हा आपली मोटार सायकल दुरुस्त करुन पिपळगांव सडक येथुन एनएच ०६ रोडाने किटाळी येथे घरी जात असतांनी लाखनी कडुन साकोली कडे जाणाऱ्या आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकलवर तीन सिट बसवुन लापरवाहीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला मागेहुन धडक मारुन फिर्यादीला व मागे बसलेली सौ. लता राऊत वय ४० वर्ष, रा. विरसी व शेवंता तुमळाम वय ४५ वर्ष, रा. शेगाव यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८४,१२८/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**८) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १३/०६/२०१७ चे ०७.३० वा. दर. यातील मृतक पांडुरंग कान्हा रोहनकर वय ६० वर्ष, रा. पेंढरी/सोनेगाव यास लखवा मारल्याने त्याने मातीचा तेल पेवुन त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पो. शि. गणविर पो.स्टे पालांदुर यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**९) अवैध देशी/जुगार दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक १५/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे साकोली, पवनी व अडयाळ येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १० लिटर हातभट्टी दारु किंमती १०००/–रु, १४१ लिटर ४८० मिली लिटर देशी दारू किंमती ४०८१०/–रु. तसेच जुगारातुन किंमती ११९०/–रु. असा एकुण किंमती ४२,९२०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १५/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०७ तीन सिटर वाहनांवरती १७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.